# अर्ज निशाणी ६६ खालील आदेश
# (CNR MHSI080006512019)

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०४ कल्पना जयसिंग मोरे यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन वारस दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.०४ ह्या दि.१०/०८/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.०४ यांचे मुदतीत रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. वादी ह्या महिला असून त्यांना कायद्याचे पुरेसे ज्ञान नाही. त्याकारणाने त्यांना आपल्या वकिलांना भेटून वेळेत माहिती देता आली नाही. वादी यांना शासकीय कार्यालयातून मृत्यू दाखला वेळेत भेटला नाही. त्यामुळे प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला आहे. प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी यांच्या वारसांच्या उपस्थिती शिवाय सदर कामाचा निकाल गुणदोषावर होणे अशक्य आहे. सदर विलंब माफ होऊन न मिळाल्यास वादीचे कायदेशीर न्याय हक्कावर बाधा येऊन त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करणेबाबत प्रस्तूत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्जात नमुद कारण संयुक्तीक नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.०४ कल्पना जयसिंग मोरे ह्या दि.१०/०८/२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदर दावा वादीने दावा मिळकतींचे वाटप होणेकरीता व ठरावाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.६६ हा मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.६६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.०४ चे वारस मुदतीत अभिलेखावर आणणेस झालेला विलंब न्यायपुर्ततेकरीता माफ करण्यात येत आहे.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2025.03.28 16:34:56 +0530

स्थळ : कणकवली (टी.एच.शेख)

दिनांक : २८/०३/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.